वसई क्र.-५	
दस्त क्र. १२३२५/	२०२४
४२/	६६

क्र.महसुल/क-१/टे-९/एनएपी/एसआर-१२७/२००४
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक - 3 JAN 2007

वाचले :-

१. श्री. झांव झुज्या लोप व इतर यांचे कुळमुख्यत्यारपत्रधारक श्री. सचिन यशेश्वर पाटील रा. विरार ता. वसई जि. ठाणे यांचा अर्ज दि. ९/१२/२००४

२. असो.प्लॅनर, सिडको वसई यांचा बिनशेतीसाठी नाहरकत दाखला क्र. सिडको/ व्हीव्हीएसआर/एनएपी/बीपी-३३२१/ई/७८१ दिनांक २/१२/२००४

३. तहसिलदार वसई यांचा अहवाल क्रमांक जमीनबाब/ एन.ए.पी./ एस.आर.-१२७/०४ दिनांक २८/१२/२००४

४. भूसंपादन शाखेचे अनौपचारिक संदर्भ क्र. सामान्य/का-४/टे-३/भूसं/कावि-१२७/०४ दिनांक ३१/१२/२००४

५. मुख्याधिकारी, विरार नगर परिषद यांचे कडील बांधकामा बाबत दाखला क्र. विनप/ दा/३९/०३ दिनांक ३०/४/२००३

६. मुख्याधिकारी, विरार नगर परिषद यांचे कडील पाणीपुरवठ्या बाबत पत्र क्र. विनप /पापु/१५०४/०४ दिनांक १०/१२/२००४

अर्जदार यांनी सादर केलेले हमीपत्र दिनांक २४/१२/२००४

इकडील कार्यालयाने दि. १६/१२/२००४ रोजीचे ' नरवीर चिमाजी ' या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेला जाहिरनामा

आदेश :-

ज्या अर्थी श्री. झांव झुज्या लोप व इतर यांचे कुळमुख्यत्यारपत्रधारक श्री. सचिन यशेश्वर पाटील रा. विरार ता. वसई जि. ठाणे यांनी ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यातील मौजे विरार या ठिकाणी स.नं. १३४/२, १३६/१/२, १३८/१ मधील जमीनीतील क्षेत्र ६९५०-०० चौ.मी. जागेचा रहिवास या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्या बाबत अर्ज केलेला आहे.

आणि ज्या अर्थी, प्रस्तावित जमीनीस बिनशेती परवानी देण्याच्या संदर्भात दिनांक १६/१२/२००४ रोजीचे दैनिक ' नरवीर चिमाजी ' या वृत्तपत्रात जाहीरनामा प्रसिध्द करणेत आला होता. सदर जाहीरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत एकही तक्रार/ हरकत या कार्यालयास प्राप्त झाली नाही.

त्या अर्थी आता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये त्यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी याद्वारे, १) श्री. झांव झुज्या लोप, २) श्री. सायमन झुज्या लोप, ३) श्री. तोमास झुज्या लोप, ४) श्री. मेंध्यु झुज्या लोप, ५) जानुबाई झुज्या लोप, रा. विरार ता. वसई जि. ठाणे रा. विरार ता. वसई जि. ठाणे यांना वसई तालुक्यातील मौजे विरार येथील आपल्या मालकीच्या स.नं. १३४/२, १३६/१/२, १३८/१ क्षेत्र [illegible] चौ.मी. क्षेत्रापैकी अतिक्रमणाखालील क्षेत्र ४७-३४० चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरित [illegible] चौ.मी. क्षेत्राची रहिवास या बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्या बाबत [illegible] शर्तीवर [illegible] परमीशन) देण्यांत येत असून सिडकोकडील मंजूर आराखड्यानुसार [illegible] क्षेत्रावर बांधकाम अनुज्ञेय नाही.

१. डी. पी. रोडखालील क्षेत्र	२७७७-६९० चौ.मी.
२. आर. जी. (१५ टक्के)	६१८-७४८ चौ.मी.
३. सी.एफ.सी (५ टक्के)	२०६-२४८ चौ.मी.

या शर्ती अशा:-

१ ही परवानगी महाराष्ट्र जमीन अधिनियम १९६६ व त्याखालील केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यांत आलेली आहे.

२/-